**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - ६ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई-४०००७१
दुरध्वनी क्र. **022&25229303**
Email ID-
dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com




**प्रेस नोट**
**दिनांक - ११/८/२०२६**
**(मानखुर्द पोलीस ठाणे)**

## ATM कार्डची अदलाबदल करून फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना मानखुर्द पोलिसांनी केली अटक

दिनांक 05/08/2026 रोजी सायंकाळी १७.०० ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी महिला या मंगलमूर्ती जंक्शन, मानखुर्द येथील HDFC बँक ATM मध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या असता, एका अनोळखी इसमाने त्यांच्या पाठीमागे उभे राहून त्यांचा ATM PIN पाहिला. त्यानंतर हातचलाखीने फिर्यादीच्या ATM कार्डची अदलाबदल करून घेतली व सदर कार्डचा डेटा व PIN वापरून त्यांच्या खात्यातून एकूण रु. १९,०००/- रोख रक्कम काढून फसवणूक केली, म्हणुन मानखुर्द पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५१५/२०२६, कलम ३०३(२), ३१८(४) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर मानखुर्द पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळ तसेच परिसरातील CCTV फुटेजची बारकाईने तपासणी केली. तपासादरम्यान घटनास्थळी तीन संशयित इसम आढळून आले. तसेच चोरीस गेलेल्या ATM कार्डचा वापर करून ज्या ATM मधून शेवटचा व्यवहार करण्यात आला, त्या ठिकाणचे CCTV फुटेजही प्राप्त करून त्याची तपासणी करण्यात आली.

CCTV फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांची ओळख पटविण्यात आली. त्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपींना त्यांच्या राहत्या परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान सदर गुन्ह्यात त्यांचा सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी सदर गुन्हा त्यांच्या इतर साथीदारांसह केल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. यशस्वी तपास करून दोन आरोपींना अटक केली असून गुन्हा उघडकीस आणला आहे. नमुद गुन्ह्यात फसवणूक केलेली मालमत्ता ८००० रुपये हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, का व सु, श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ०१, समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिलाल शेख, यांच्या मार्गदर्शनाखाली, पो.नि.हनुमंत ओउळकर, पोलीस उप निरीक्षक भगवान हिरवे, पो.ह.सोनवणे, पो.हवा.देरेकर व पो.हवा. शिंदे तसेच तांत्रिक मदत पो.ह. दशरथ राणे यांनी केली आहे.

***